OK

सचिव विभाग
मा. स्थायी समिती सभा
दि: २०/०६/२०२३. वे: ११:००
प्रकरण-क्र. ४२ ते ४६
मूळप्रत

(८)

१२/१४

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १५/०६/२०१३.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. ०७ :- दिनांक १५/०६/२०१३**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा गुरुवार दि. २०/०६/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०७, दि. १५/०६/२०१३ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०७, दि. १५/०६/२०१३ सोबतची विषय पत्रिका**
**सभा गुरुवार दि. २०/०६/२०१३**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ४२ | मिरारोड (पूर्व) प्लीझंट पार्क येथील आरक्षण क्र. ३५५ मैदानात कुंपणभिंत बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| ४३ | मिरारोड (पूर्व) संघवी नगर, रिषभ इमारत ते गोकुळधाम पर्यंत रस्ता तयार करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| ४४ | अग्निशमन दलाच्या एरियल लॅड प्लॅटफॉर्म (टी. टी. एल.) वाहनाच्या ॲन्युअल मेंटनन्स करारा बाबत. |
| ४५ | निविदांना मंजूरी देणे. (आरोग्य विभाग) |
| ४६ | निविदांना मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- १५/०६/२०१३.**

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०७, दि.   /०६/२०१३ सोबतची विषय पत्रिका

सभा   वार दि.   /०६/२०१३

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ४२ | मिरारोड (पूर्व) प्लीझंट पार्क येथील आरक्षण क्र. ३५५ मैदानात कुंपणभिंत बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| ४३ | मिरारोड (पूर्व) संघवी नगर, रिषभ इमारत ते गोकुळधाम पर्यंत रस्ता तयार करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| ४४ | अग्निशमन दलाच्या एरियल लॅड प्लॅटफॉर्म (टी. टी. एल.) वाहनाच्या ॲन्युअल मेंटनन्स करारा बाबत. |
| ४५ | निविदांना मंजूरी देणे. (आरोग्य विभाग) |
| ४६ | निविदांना मंजूरी मिळणेबाबत (पाणी पुरवठा विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

दिनांक :-   /०६/२०१३.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सभापती
स्थायी समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २०/०६/२०२३

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक :- ( ८२ )** मिरारोड (पूर्व) प्लीझंट पार्क येथील आरक्षण क्र. ३५५ मैदानात कुंपण भिंत बांधणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या विकास आराखडयात आरक्षण क्र. ३५५ हे खेळाच्या मैदानासाठी आरक्षित आहे. सदर जागेवर मोठया प्रमाणावर भंगारवाले व इतरांकडुन सदर जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण होत आहे. सदर अतिक्रमणावर पोलिस बंदोबस्तामध्ये अनधिकृत बांधकाम विभागामार्फत तोडक कार्यवाही करण्यात आली आहे. सदर जागेवर पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी व मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध होण्याकरीता कुंपनभिंत बांधण्यासाठी रु. ३६,१२,७५०/- एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक तयार केले आहे. सदर जागेचे एकूण क्षेत्र १९२००.०० चौ.मीटर असून त्यापैकी १७१६२.१६ चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले आहे.

सदर कामाकरीता अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध असुन सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता (साबां)**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC5/13-14/DK/SG-10

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २०/०६/२०१३

## // गोषवारा //


**प्रकरण क्रमांक (८३)** :- मिरारोड (पूर्व) संघवी नगर, रिषभ इमारत ते गोकुळ धाम पर्यंत रस्ता तयार करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पूर्व) प्रभाग क्र. ४३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज मार्गापासून संघवी नगर ते गोकुळधाम कडे जाणारा १८.०० मीटर रुंदीचा विकास योजनेतील रस्ता आहे. सदर रस्ता संघवी नगर पर्यंत तयार केला असून सदर रस्ता गोकुळधाम पर्यंत खडीकरण, डांबरीकरण केल्यास पर्यायी रस्ता तयार होणार आहे. सदर ठिकाणी १८५.०० मीटर लांबीचा व १३.८० मीटर रुंदीचा रस्ता तयार करण्यासाठी रु. ४८,८५,१००/- एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

**कार्यकारी अभियंता (सा.बां)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने.**

PC-3/DK/2013-14/SG-2



# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि.२०/०६/२०१३

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्रमांक ( ४४ )** अग्निशमन दलाच्या एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) वाहनाच्या ॲन्युअल मेंटनन्स करारा बाबत.

मिरा भाईंदर अग्निशमन दलाने मे. रोझनबाउर इंटरनॅशनल यांचेकडुन ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) वाहन खरेदी करण्यात आले आहे. सदरचे वाहन हे अद्ययावत वाहन असल्याने सदर वाहनाचे वेळच्यावेळी मेंटेनन्स होणे आवश्यक आहे. सदर वाहन अग्निशमन दलास प्राप्त झालेनंतर अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना केवळ वाहनाच्या ऑपरेशन व लॅडरच्या जुजबी मेंटनन्सबाबत प्रशिक्षण देण्यात आले आहे परंतु सदर वाहनाच्या हायड्रोलीक यंत्रणेबाबत, मॅकॅनिकल यंत्रणेबाबत, गिअर बॉक्स व पीटीओ इत्यादी सारख्या अती महत्वाच्या साधनांच्या मेंटनन्सबाबत कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आलेले नाही. सदरचे वाहन  हे अद्ययावत वाहन असुन भारतीय बनावटीचे नसल्याने सदर वाहनाच्या अती महत्वाच्या भागांचे मेंटनन्स करण्याकरिता अभियांत्रिकी दर्जाची अर्हता व अनुभव प्राप्त असलेले कर्मचारी उपलब्ध असणे आवश्यक आहे. अशा प्रकारची अर्हता प्राप्त अनुभवी कर्मचारी अग्निशमन दलात उपलब्ध नसल्याने वाहनाचे मेंटनन्स करणे अडचणीचे ठरणार आहे. वाहनाची व वाहनाच्या सुटया भागांची  किंमत लक्षात घेता वाहनाच्या मेंटनन्स करिता अनुभवी कर्मचारी असणे संभाव्य आर्थिक खर्चाच्या दृष्टीने सोयीचे ठरेल.

कंपनीने सदर वाहनाकरिता दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी दिला आहे. सदर कालावधीत केवळ वाहनाच्या मॅन्युफॅक्चरिंग (उत्पादीत) साहित्याकरिता लागु पडतो. त्यामुळे वॉरंटी कालावधीत वाहनाच्या मेंटनन्स उदा. ऑइलिंग, ग्रिसींग, हायड्रोलीक प्लॅटफॉर्म, जनरेटर इत्यादी घटकांचा समावेश होत नाही.

सदरचे वाहन खरेदी करणेकामी प्रसिध्द केलेल्या निविदा पत्रिकेत वाहनाच्या वार्षिक देखभाली करिता दर मागविण्यात आले होते व सदर प्राप्त दरानुसार करारनामा करण्यात आला आहे. सदर करारनाम्यात नमुद दर पुढिलप्रमाणे:

| | |
|---|---|
| वर्ष पहिले | : रु. ८,१४,४५०/- |
| वर्ष दुसरे | : रु. ५,९०,०७०/- |
| वर्ष तिसरे | : रु. ८,०८,४७०/- |
| वर्ष चौथे | : रु. ७,७७,४१९/- |
| वर्ष पाचवे | : रु. ८,९१,२०४/- |

उपरोक्त दर हे निविदा पत्रिकेतील अटीनुसार म्हणजेच प्रती वर्ष सहा (६) भेटी (व्हिजीट) करिता आहेत.

मे. ॲनलोन आयपीएस यांनी टी टी एल वाहनाच्या प्रथम वर्ष मेंटनन्स करिता रु. ९,०५,४५०/- एवढा दर सादर केला आहे. सदर दरात मे. ॲनलोन आयपीएस हे त्यांचा अभियंता १(एक) वर्षाकरिता आठवडयाचे सहा दिवस आठ तासांकरिता अग्निशमन दलात उपलब्ध करुन देणार आहेत तसेच आठ तासांव्यतिरिक्त इतर आवश्यक वेळी देखिल सदर अभियंता अग्निशमन दलास उपलब्ध होवु शकेल असे कळविले आहे.

अग्निशमन दलाच्या टी. टी. एल. वाहनाची आवश्यकत लक्षात घेवुन मेंटनन्स करिता वार्षिक ठेका प्रदान केल्यास वाहन हाताळते समयी काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास ती त्याचवेळी दुरुस्त होवुन वेळेचा अपव्यय टाळता येणार आहे. वरिल वाहनाची आवश्यकता व खर्च लक्षात घेवुन मे. ॲनलॉन आयपीएस ह्यांना वार्षिक ठेका देणे योग्य होणार आहे.

तरी मे. ॲनलॉन आयपीएस ह्यांना टी. टी. एल्. वाहनाचा वार्षिक ठेका देणे व त्यास आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळण्यास मा. स्थायी समितीस निर्णयास्तव शिफारस आहे.

उप-आयुक्त
**अग्निशमन व आणीबाणी सेवा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि.२८/६/२०१३

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.४५** - निविदांना मंजुरी देणे. (आरोगय विभाग)

**विषय :-** **विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे व NP-3 आर.सी.सी. पाईप खरेदी करणे कामाच्या निविदांना मंजुरी देणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागातर्फे विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे व NP-3 आर.सी.सी. पाईप खरेदी करणे कामाच्या ई-टेंडरिंगद्वारे तीन वेळा निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदापैकी मे. गणेश डेव्हलपर्स व मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांचे निविदेतील दरामध्ये वाटाघाटी करून खालीलप्रमाणे दर सादर केले आहे.

१) मे. मनोहर ट्रेडींग कंपनी

| Sr. No. | Description | निविदेतील दर | | वाटाघाटी नंतरचे दर | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | SUCTION PUMP WITH OPERATOR, DEISEL, PETROL ETC. - 10 HP | रु. ४७५/- प्रती तास | रु. १,७१,०००/- प्रती महिना | **रु. ४०८/- प्रती तास** | **रु. ९७,९२०/- प्रती महिना** |
| | - 15 HP | रु. ५२५/- प्रती तास | रु. १,८९,०००/- प्रती महिना | **रु. ४४८/- प्रती तास** | **रु. १,०७,५२०/- प्रती महिना** |

२) मे. गणेश डेव्लपर्स

| Sr. No. | Description | निविदेतील दर | वाटाघाटी नंतरचे दर |
|---|---|---|---|
| 2 | NP-3 - RCC PIPE SUPPLYING & LAYING - 01 FT DIA x 6 FT | रु. ४,०६०/- प्रती नग | **रु. ३२२०/- प्रती नग** |
| | - 02 FT DIA x 6 FT | रु. ९,४९७/- प्रती नग | **रु. ७५३२/- प्रती नग** |
| | - 03 FT DIA x 6 FT | रु. १६,५३०/- प्रती नग | **रु. १३,११०/- प्रती नग** |

पावसाळ्या दरम्यान सखल भागातील पावसाच्या पाण्याचा उपसा करणे कामी विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा तातडीने करणेचे दृष्टीने विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप खरेदी करणे अत्यावश्यक आहे.

सदरचा निविदा मंजुरीचा प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणेस शिफारस असे.

मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने

(सही)
~~उप आयुक्त~~ (आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\Raj\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Dewatering Rcc Tender.docx

विभाग.

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

मा. स्थायी समिती सभा दि.२० /०६/२०१३.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ७८ :- निविदेस मंजुरी मिळणेबाबत. (पाणी पुरवठा विभाग)**

पाणी पुरवठा विभागाच्या दैनदिन वितरण व्यवस्था व किरकोळ दुरुस्ती करिता सी.आय. पाईप १०० ते ५०० मि.मी. व्यासाच्या पाईपची आवश्यकता भासत असल्याने पाईप पुरवठा करण्यासाठी वार्षिक मुदतीने निविदा दि.०४/०४/२०१३ रोजीच्या दै. मुंबई लक्षदिप व दै. आफ्टरनून या वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या विषयांकीत सुचनेनुसार प्राप्त निविदा दिनांक २०/०५/२०१३ रोजी उघडण्यात आल्या. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**सी. आय. (एस. ॲन्ड एस.) टायटन पाईप्स (LA- Class) आय. एस. नं १५३६:२००१ आणि समकक्ष ISO/B.S स्टॅंडर्डप्रमाणे १०० मीमी ते ५०० मीमी व्यासाचे पुरवठा करणे.**

| व्यास | मे. विंध्या ट्रेडर्स निविदेचा दर (रू.) | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) |
|---|---|---|
| १०० मि.मी | १६३१.०० | १५९२.०० |
| १५० मि.मी | २६७६.०० | २६४०.०० |
| २०० मि.मी | ३८९७.०० | ३८३४.०० |
| २५० मि.मी. | ५२०४.०० | ५०५०.०० |
| ३०० मि.मि | ६७५३.०० | ६५००.०० |
| ३५० मि.मि | ८४५०.०० | ८२२५.०० |
| ४०० मि.मि | ११००९.०० | १०२००.०० |
| ४५० मि.मि | १३३७२.०० | १३२२५.०० |
| ५०० मि.मि | १५७८९.०० | १४९००.०० |

वरील कामासाठी मे. केशरी ॲन्ड कंपनी यांचे सर्व निविदाधारकामध्ये लघुत्तम दर प्राप्त झालेले होते. सदर दर वाटाघाटीनंतर प्राप्त झालेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| व्यास | मे. केसरी ॲन्ड कंपनी निविदेचा दर (रू.) | वाटाघाटीनंतर प्राप्त झालेले दर |
|---|---|---|
| १०० मि.मी | १५९२.०० | १३२०.०० |
| १५० मि.मी | २६४०.०० | २१०५.०० |
| २०० मि.मी | ३८३४.०० | ३०८०.०० |
| २५० मि.मी. | ५०५०.०० | ४१००.०० |
| ३०० मि.मि | ६५००.०० | ५२८५.०० |
| ३५० मि.मि | ८२२५.०० | ६६५०.०० |
| ४०० मि.मि | १०२००.०० | ८१०५.०० |
| ४५० मि.मि | १३२२५.०० | ९७८०.०० |
| ५०० मि.मि | १४९००.०० | ११४६५.०० |

उपरोक्त तुलनात्मक तक्ता पाहता सद्यस्थितीत पाईपच्या दरामध्ये बरीच वाढ झाल्याने सदर दर हे रास्त व वाजवी वाटत असल्याने मान्यता मिळण्यास शिफारस आहे.

कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा विभाग
मिरा-भाईदर महानगरपालिका

मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने